2 5 APR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी

## बेडकिहाळ : विद्यापीठात महर्षी शिंदे अध्यासनातर्फे व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महर्षी शिंदे यांचे विचार, कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानप्रसंगी बोलताना किशोर बेडकिहाळ. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे आदी.**

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचार व कार्याची समकालीन प्रस्तुतता' या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ कवी प्रा. इंद्रजित भालेराव उपस्थित होते.

बेडकिहाळ म्हणाले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना समाजातील सर्व प्रश्नांची आस्था होती. त्यांनी समाजाला धर्मविषयक नवी दृष्टी देण्याचे काम केले. महाराष्ट्र व भारतधर्माची त्यांनी नवी व्याख्या केली. आजच्या धर्मसत्ता, बाजारी, भांडवली रचनेमुळे होणारे ध्रुवीकरण रोखण्यासाठी त्यांच्या विचारांची आवश्यकता आहे. ज्येष्ठ कवी प्रा. भालेराव यांनी 'महर्षी शिंदे यांच्या शेतीविषयक विचारकार्याची प्रस्तुतता' या विषयावर विचार मांडले. कुलगुरू प्रा.डॉ.डी.टी. शिर्के म्हणाले, महर्षींचे विचार उपेक्षित राहणार नाहीत. नव्या पिढीला ऊर्जा देत राहतील. प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तेजस चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. प्रभंजन माने, सुरेश शिपूरकर उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ पुनर्परीक्षांना आजपासून प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सोमवारपासून (दि. २५) पुनर्परीक्षांना प्रारंभ होणार आहे. विद्यापीठ संकेतस्थळावर याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.




शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ च्या हिवाळी सत्रातील परीक्षा मार्च-एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आल्या. या परीक्षा देताना तांत्रिक अडचणी आलेल्या व पुनर्परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा सोमवारपासून सुरू होतील. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी पुनर्परीक्षा देणे आवश्यक आहे. अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षेचा निकाल अंतिम राहील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
2 5 APR 2022
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या पिढीने वेळेचे स्मार्ट नियोजन करावे

## डॉ. उमेश देशपांडे; केआयटीमध्ये 'पायोनिअर-२०२२'चे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आजची पिढी प्रचंड स्मार्ट असून, नव्या पिढीने स्वतःच्या वेळेचे स्मार्ट नियोजन करावे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्वतःची, समाजाची आणि देशाची प्रगती करावी, असे प्रतिपादन मर्सिडीज बेंझचे जनरल मॅनेजर डॉ. उमेश देशपांडे यांनी केले.

केआयटीच्या अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयात इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीई) स्टुडंट चॅप्टर अंतर्गत आयोजित 'पायोनिअर-२०२२' या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती, तर अध्यक्षस्थानी केआयटीचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी होते.

देशपांडे यांनी त्यांच्या करिअर व महाविद्यालयीन आयुष्यातील आठवणी सांगून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आयुष्यात काम आणि व्यक्तिगत आयुष्य यांचा समतोल साधत जगण्याचा आनंद शोधा, ध्येयवादी बना, उत्साही राहा आणि महाविद्यालयीन आयुष्याचा



**कोल्हापूर : 'पायोनिअर-२०२२'चे उद्घाटन करताना डॉ. उमेश देशपांडे. शेजारी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, सुनील कुलकर्णी, दीपक चौगुले, डॉ. विलास कार्जिन्नी, डॉ. मनोज मुजुमदार आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

आनंद लुटा, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाचे महत्त्व सांगून वाचन करण्याचा सल्ला दिला. देशातील इनोव्हेशनसाठी सन्मानित व्यक्तींच्या काम व अनुभवाचा अभ्यास करण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

सुनील कुलकर्णी म्हणाले, केआयटीची सामाजिक आणि संशोधनाची सामाजिक बांधिलकी अधिक मजबूत करणार आहे. संशोधक विद्यार्थ्यांना २० लाख रुपयांपर्यंतचा संशोधक निधी देणार आहे. याप्रसंगी बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या सीईटी तयारीसाठी केआयटीने तयार केलेल्या 'केआयटी-सीईटी' या ॲप्लिकेशनचे उद्घाटन झाले.

कार्यकारी संचालक डॉ. विलास कार्जिन्नी यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. जितेंद्र भाट यांनी प्रास्ताविक केले. आयएसटीई फॅकल्टी ॲडव्हायजर प्रा. अभिजित पाटील, विद्यार्थी उपक्रम अधिष्ठाता डॉ. अक्षय थोरवत, सचिव दीपक चौगुले, संचालक डॉ. मनोज मुजुमदार आदी उपस्थित होते.

दानिश पाटील, निधी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. आयएसटीई विद्यार्थीप्रमुख सारस गायकवाड यांनी आभार मानले. स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ इन्फोसाईट कन्सल्टिंग, बंगळुरूचे उपाध्यक्ष क्लायंट सर्व्हिसेस मनोज बी. एम. यांच्या उपस्थितीत होईल. दीड लाख रुपयांची रोख बक्षिसे, प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत.

यंदाचे पायोनिअर स्पर्धेचे रौप्यमहोत्सवी पर्व आहे. यात 'अभिव्यक्ती - आंतरविद्याशाखीय शोधनिबंध स्पर्धा' आणि 'प्रकल्प - तांत्रिर विषयावरील प्रकल्पांचे सादरीकरण' स्पर्धांबरोबर प्रत्येक विभागामार्फत विविध तांत्रिक स्पर्धा होणार आहेत. रविवारी सात प्रकारच्या विविध स्पर्धा झाल्या.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, आयसीटी यांच्यात सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने उच्च-गुणवत्तेचे अभियांत्रिकी शिक्षण व संशोधनासाठी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी), मुंबई पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

सामंजस्य करारावर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व आयसीटीच्या रिसर्च अँड इनोव्हेशन अधिष्ठाता प्रा. डॉ. पद्मा व्ही. देवराजन यांनी स्वाक्षरी केली. करारासाठी शिवाजी विद्यापीठातील प्रा. आर. जी.



सोनकवडे, प्रा. के. वाय. राजपुरे तर आयसीटीचे प्रा. आर. आर. देशमुख, प्रा. पी. आर. गागळे उपस्थित होते. सामंजस्य करारामुळे संयुक्त संशोधन व प्रकाशनास गती मिळेल, असे प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी सांगितले.

“

सामंजस्य करार प्राध्यापक, विद्यार्थी आणि इतर भागधारकांसाठी उपयुक्त ठरेल. शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान विभागात, सैफ-सीएफसी सेंटर व आयसीटीच्या विविध कॅम्पसमध्ये उपलब्ध असणारी अत्याधुनिक उपकरणे. वापरण्यासाठीचे कौशल्य एकमेकांस नक्की उपयुक्त ठरतील.

**- प्रा.अनिरुद्ध पंडित, कुलगुरू, आयसीटी**

आयआयटीनंतर ही उच्चभ्रू संस्थांपैकी एक आहे. मुख्यतः भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी विभाग, अशा विविध प्रमुखविज्ञान विभागांमधील संयुक्त स्वारस्य असलेला हा सामंजस्य करार करण्यासाठी आयसीटीचे मनापासून आभार.

**- प्रा. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

25 APR 2022 तरुण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आयसीटीचा करार विद्यापीठ संशोधनाचे बलस्थान

## सामंजस्य करारामुळे संशोधन, कौशल्य, शैक्षणिक देवाणघेवाण होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

आयसीटीबरोबर केलेला सामंजस्य करार म्हणजे शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाचे बलस्थान बनला आहे. जागतिक संशोधनाच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधकांनी स्थान मिळवले आहे. आता या संशोधनाला आयसीटीच्या माध्यमातून बळकटी मिळणार आहे, या करारासाठी डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर शिक्षण क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शिवाजी विद्यापीठाने मुंबई येथील इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) सोबत पाच वर्षांसाठी सामंजस्य करार केला आहे. या सामंजस्य करारावर विद्यापीठाकडून प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आणि मुंबई रिसर्च अँड इनोव्हेशन, आयसीटीचे डीन डॉ. पद्मा व्ही. देवराजन यांनी स्वाक्षरी केली आहे. या करारासाठी विद्यापीठातील डॉ. आर. जी. सोनकवडे आणि प्रा. के. वाय. राजपुरे तर आयसीटीचे प्रा. आर. आर. देशमुख आणि प्रा. पी. आर. गागळे, यांनी प्रयत्न केले.

सहयोगी कार्यक्रम आणि इतर शैक्षणिक देवाणघेवाण होणार आहे. विद्यापीठ आणि आयसीटी यांच्यात शैक्षणिक आणि वैज्ञानिक सहकार्यावर आधारित परस्पर फायदेशीर संबंध प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने सामंजस्य करार केला आहे. यातून नवीन तंत्रज्ञान-वर्धित संशोधन अपेक्षित आहे. हा सामंजस्य करार एक पाया असेल, नंतर आवश्यक असल्यास, विशिष्ट विभागांसोबत स्वतंत्र सामंजस्य करार अंमलात आणला जाईल. आयसीटी आणि प्रा.आर. जी. सोनकवडे, कोरोना महामारीच्या पहिल्या लाटेदरम्यान सॅनिटायझेशन टनेल विकसित केले. ज्यामध्ये डिस्क्रिट पार्टिकल मॉडेलिंग (डीपीएम) पद्धतीचा वापर करून अत्याधुनिक **ANSYS** सिम्युलेशनचा समावेश होता. टनेलमधील धुके मार्ग नोझलची संख्या, अभिमुखता आणि वायु-द्रव (जंतुनाशक) प्रवाहावर अवलंबून आहे. या धुके-आधारित सॅनिटायझेशनच्या वापरामुळे रुग्णसेवक कर्मचारी, पोलीस आणि अत्यावश्यक सेवा प्रदान करणाऱ्या कर्मचाऱ्यांसह आघाडीच्या आरोग्यसेवा व्यावसायिकांना संरक्षण मिळणे अपेक्षित आहे. या लोकांना संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते आणि नकळतपणे विविध स्त्रोतांमधून पसरते. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या निर्देशामुळे या सॅनिटायझेशन टनेलचे व्यापारीकरण थांबवण्यात आले. या सामंजस्य करारामुळे, दोन्ही विद्यापीठांनी विविध संशोधन उपक्रम सुरू केले आहेत. त्याचे प्रस्ताव निधी संस्थांकडे सादर केले जातील. दोन्ही संस्थांमधील या समान स्वारस्य असणाऱ्यांना या सामंजस्य करारामुळे संयुक्त संशोधन आणि प्रकाशनाला आणखी गती मिळेल. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे कौशल्ये विकासासाठी हा करार नक्कीच उपयुक्त ठरणार आहे. संयुक्त संशोधन आणि प्रकाशनांच्या शक्यता विकसित करण्यासाठी संयुक्त चर्चासत्रे, परिषदा आणि कार्यशाळा आयोजित करून प्रशासन आणि व्यवस्थापनाशी संबंधित अनुभव आणि कौशल्याची देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहित करेल.

### आयसीटीबरोबर शिवाजी विद्यापीठाला संशोधनाची संधी



आयसीटीबरोबर शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्यामुळे संशोधनाची बलस्थाने उपलब्ध झाली आहेत. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून संशोधन करण्यासाठीची चांगली संधी उपलब्ध झाली आहे. ही शिवाजी विद्यापीठाच्या प्रगतीचे पुढचे पाऊल म्हणावे लागेल.

**- डॉ. डी. टी. शिर्के (कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ)**

सामंजस्य करार प्राध्यापक, विद्यार्थी आणि इतर विज्ञान विभागात एसएआयएफ, सीएफसी सेंटरसह आयआयटीच्या विविध कॅंपसमध्ये उपलब्ध असणारी अत्याधुनिक उपकरणे वापरण्यासाठीचे कौशल्य एकमेकांना उपयुक्त ठरणार आहे.

**डॉ. अनिरूध्द पंडीत**
**कुलगुरु, आयसीटी**

### नवीन दोन प्रोजेक्टवर काम सुरू



माझ्या किरणोत्सार संशोधनाचा फायदा आयसीटीला होणार आहे. सध्या खाद्य पदार्थ खराब होण्यापूर्वी त्याची पाहता क्षणी माहिती मिळवण्यासाठी एक संशोधन सुरू आहे. तर शेती, कॅन्सर आणि इतर क्षेत्रात किती प्रमाणात किरणोत्साराची मात्रा वापरावी यावर दुसरे संशोधन सुरू आहे. यासाठी आयसीटीचे कुलगुरू डॉ. अनिरूध्द पंडीत स्वत: लक्ष घालत आहेत.

**- डॉ. आर. जी. सोनकवडे (सैफ-सीएफसीप्रमुख)**

तरुण भारत

# विद्यापीठ पुनर्परीक्षेला आजपासून प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत ऑक्टोबर-



नोव्हेंबर हिवाळी सत्रातील ऑनलाईन पुनर्परीक्षेला सोमवारी २५ एप्रिलला प्रारंभ होणार आहे. हिवाळी सत्रातील परीक्षा देण्यासाठी ज्याना तांत्रिक अडचण आली आहे. त्यांच्यासाठी पुनर्परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी लिंक ओपन करून दिली होती. मुदतीत अर्ज भरलेल्यांना परीक्षा देता येणार आहे. ९०० विषयांसाठी ९ हजार विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देणार आहेत. परीक्षेचा सराव व्हावा म्हणून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर डेमो उपलब्ध करून दिला होता.

जनसंपर्क कक्ष
25 APR 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बाबासाहेबांचे विचार आजही दिशादर्शक

## डॉ. आलोक जत्राटकर, प्रा. गौतम जाधव यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार, सामाजिक समतेचे तत्त्व, न्याय्य हक्कासाठी त्यांनी दिलेला लढा आजच्या परिस्थितीतही प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात श्रीपतराव बोंद्रेदादा स्मृती व्याख्यानमालेतील आठवे पुष्प गुंफताना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता' या विषयावर ते बोलत होते. यावेळी प्राध्यापक गौतम जाधव लिखित 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर' पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, प्रा. गौतम जाधव यांनी मते मांडली. कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे मार्गदर्शन लाभले.

तरूण भारत

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंचे कार्य प्रेरणादायी

▪ ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांची दृष्टी भव्यदिव्य होती. समाजातील सर्व प्रश्नांची शिंदे यांना आस्था होती. तसेच धर्माविषयी नवी दृष्टी देण्याचं काम महर्षी शिंदे यांनी केले. आजच्या धर्मसत्ता, बाजारी, भांडवली रचनेमुळे होणारे ध्रुवीकरण रोखण्यासाठी महर्षी शिंदे यांचे विचार, कार्य आजही प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्यावतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचार व कार्याची समकालीन प्रस्तुतता' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. ज्येष्ठ कवी प्रा. इंद्रजीत भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

बेडकीहाळ म्हणाले, शिंदे यांची दृष्टी समग्रतावादी होती. महाराष्ट्र व भारतधर्माची त्यांनी नवी व्याख्या केली. मराठी विषयांच्या अनेक अभ्यासकांवर त्यांच्या विचारांचा पगडा आहे. परंतू महर्षी शिंदे यांचे विचार आणि कार्य म्हणावे तितके प्रसारीत झालेले नाही. तर अभ्यासकांनी संशोधन करून त्यांचे कार्य नवीन पिढीपर्यंत पोहचवले पाहिजे.

ज्येष्ठ कवी इंद्रजीत भालेराव यांनी महर्षी शिंदे यांच्या शेतीविषयक विचारकार्याची प्रस्तुतता या विषयावर विचार मांडले. शिंदे यांच्या शेतकरी चळवळीतील योगदान व द्रष्टेपण त्यांनी नमूद केले. त्यांनी 'वि. रा. शिंदे तुम्ही महर्षी, तुम्ही कर्मवीर गाढे, सदैव गाईल महाराष्ट्र हा तुमचे गुण पोवाडे' ही महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावरील 'महर्षी' कविता सादर केली. अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, अशा कार्यक्रमांमुळे महर्षींचे विचार उपेक्षित राहणार नाहीत. नव्या पिढाला ऊर्जा देत राहतील. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. नंदकुमार मोरे यांनी करून दिला. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. आभार डॉ. तेजस चव्हाण यांनी मानले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. प्रभंजन माने, सुरेश शिपुरकर, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
25 APR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांनी तंत्रज्ञानातून देशाची प्रगती करावी

## मर्सिडीज बेन्झचे जनरल मॅनेजर डॉ. उमेश देशपांडे यांचे प्रतिपादन : केआयटीमध्ये पायोनिअर रौप्य महोत्सवी पर्व

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

तरुण पिढी प्रचंड स्मार्ट आहे या स्मार्टपिढीने स्वतःच्या वेळेचे स्मार्ट नियोजन करावे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्वतःची समाजाची आणि देशाची प्रगती करावी, असे प्रतिपादन मर्सिडीज बेन्झचे जनरल मॅनेजर डॉ. उमेश देशपांडे यांनी व्यक्त केले.

केआयटी महाविद्यालय आणि इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीई) स्टुडन्ट चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पायोनिअर राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी केआयटीचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी होते.

डॉ. देशपांडे म्हणाले, आयुष्यामध्ये काम आणि व्यक्तिगत आयुष्य यांचा समतोल साधत जगण्याचा आनंद शोधा. ध्येयवादी दृष्टीकोन ठेवून महाविद्यालयीन आयुष्याचा




**कोल्हापूर : पायोनियरचे उद्घाटन करताना डॉ. उमेश देशपांडे. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अध्यक्ष सुनील कुलकर्णी, सचिव दीपक चौगुले, कार्यकारी संचालक डॉ. विलास कार्जीन्नी, संचालक डॉ. मनोज मुजुमदार आदी.**

आनंद लुटा. समाधान आणि आनंद आयुष्यात विकत मिळत नाही, त्यामुळे आनंदी राहाल तर तुमचे खासगी आणि व्यावसायिक आयुष्य छान होईल. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी संशोधनाबरोबर वाचन केले पाहिजे. देशातील इनोव्हेशनमधील व्यक्तीच्या कामाचा, अनुभवाचा अभ्यास केला पाहिजे.

सुनील कुलकर्णी म्हणाले, केआयटी संशोधनातून सामाजिक बांधिलकी मजबूत करणार आहे. संशोधक विद्यार्थ्यांना २० लाख रुपयांपर्यंतचा संशोधन निधी दिला जाणार आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या सीईटी तयारीसाठी केआयटीमधील KITCET या ॲप्लिकेशनचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते केले. कार्यकारी संचालक डॉ. विलास कार्जीन्नी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. पायोनियरचे समन्वयक डॉ. जितेंद्र भाट यांनी प्रास्ताविक केले. आयएसटीई विद्यार्थी प्रमुख सारस गायकवाड याने आभार मानले. सूत्रसंचालन दानिश व निधी पाटील यांनी केले. यावेळी आयएसटीई फॅकल्टी ॲडव्हायजर प्रा. अभिजित पाटील, उपक्रमअधिष्ठाता डॉ. अक्षय थोरवत, सचिव दीपक चौगुले, संचालक डॉ. मनोज मुजुमदार आदी उपस्थित होते.

**पायोनिअर स्पर्धेचे यंदा रौप्यमहोत्सवी पर्व**

गेल्या २५ वर्षापासून केआयटी कॉलेजमध्ये पायोनियर अंतर्गत 'अभिव्यक्ती' व 'प्रकल्प' या मुख्य स्पर्धा आणि स्टार्टअप ॲंड बिजनेस आयडिया', टेक्निकल डॉक्युमेंटरी, 'डाइव्ह इन सर्किट– बिल्ड द सर्किट, अशा सात प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धांचे यंदा रौप्यमहोत्सवी पर्व आहे. स्पर्धेत १.५० लाखांची रोख बक्षिसे, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत.